स्थापना १९३९
# पुढारी
www.pudhari.com

## शिंदे कॉलेजच्या ४५ विद्यार्थ्यांना मिळाला रोजगार

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

भडगाव (ता. गडहिंग्लज) येथील डॉ. ए. डी. शिंदे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग या अभियांत्रिकी महाविद्यालयातील अंतिम वर्षातील विविध शाखांच्या ४५ विद्यार्थ्यांची कॅम्पस मुलाखतीद्वारे नामांकित कंपन्यांमध्ये रोजगारासाठी निवड झाली.




**भडगाव : शिंदे इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये मुलाखतीतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांसोबत शिक्षक.**

इलेक्ट्रिकलच्या अंतिम वर्षातील ५१ विद्यार्थ्यांपैकी ४५ विद्यार्थी एलअँडटी, जीकेएन एरोस्पेस, ऑलसेट्रा ग्रीन टेक प्रा. लिमिटेड, जीकेएन फोकर अलमो प्रायव्हेट लिमिटेड अशा नामांकित आस्थापनांमध्ये मोठ्या पॅकेजवर निवड झाली आहे. संस्थेच्या सचिव प्रा. स्वाती कोरी, प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. नवीन शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये संस्थेने काळानुरूप नवीन तंत्रज्ञानाचा अविष्कार पाहता आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग, मेकॅनिकल अँड मॅकेट्रॉनिक्स, इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल अँड कॉम्प्युटर सायन्स, सिव्हील इंजिनिअरिंग (प्रादेशिक व इंग्रजी भाषा) कॉम्प्युटर सायन्सच्या अभ्यासक्रमांना प्रवेश सुरू झाले असून, विद्यार्थ्यांनी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

My Kolhapur Edition
May 30, 2024 Page No. 18
Powered by: erelego.com


# पुण्य नगरी


## डॉ. ए. डी. शिंदे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांची निवड

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

भडगाव (ता. गडहिंग्लज) येथील डॉ. ए. डी. शिंदे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग महाविद्यालयातील अंतिम वर्षातील विविध शाखांच्या विद्यार्थ्यांची कॅम्पस मुलाखतीद्वारे नामांकित कंपन्यांमध्ये नियुक्ती झाली. मेकॅनिकल, सिव्हिल, इलेक्ट्रिकल या कोअर शाखांच्या विद्यार्थ्यांनी गेल्या सहा महिन्यांत विविध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली.

इलेक्ट्रिकल फायनल इयर ५१ विद्यार्थ्यांपैकी ४५ विद्यार्थी एल अँड टी. जी.के.एन एरोस्पेस



**भडगाव : निवड झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत मार्गदर्शक शिक्षक.**

ऑलसेट्रा ग्रीन टेक प्रा. लि., जी. के. एन. फोकर अलमो प्रायव्हेट लि. अशा नामांकित आस्थापनांमध्ये मोठ्या पॅकेजवर निवड झाली आहे.

या निवड प्रक्रियेसाठी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाने विशेष अभियानांतर्गत कॅम्पस मुलाखतीचे नियोजन केले. प्रा. एस. पी. गंध यांनी एच. आर. विभागांशी समन्वय साधून विद्यार्थ्यांना संधी प्राप्त करून दिली. तसेच अभय देसाई, डॉ. वीरेश मठड यांनी प्रयत्न केले. सचिव प्रा. स्वाती कोरी, प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

नवीन शैक्षणिक वर्षामध्ये संस्थेने काळानुरूप नवीन तंत्रज्ञानाचा अविष्कार पाहता आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मॅकेस्ट्रानिक्स, इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल अँड कॉम्प्युटर सायन्स, सिव्हिल इंजिनिअरिंग प्रादेशिक भाषा व इंग्रजी भाषा व कॉम्प्युटर सायन्सची मान्यता घेऊन प्रवेश सुरू केले आहेत. तरी विभागातील विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांनी केले आहे.

Smart Kolhapur Edition
May 30, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com